स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य

# (राज्यस्तरीय शिष्यवृत्ती शाखा)

**दुरघ्वनी: 020-29707098/26126939**

**ईमेल : schol.dhepune@gov.in**

# ❖उच्च शिक्षण संचालनालय यांच्या अंतर्गत येणाऱ्या विभागीय कार्यालयांची माहिती

| अ. क्र | कार्यालयाचे नाव | नोडल अधिकारी यांचे नाव | सहाय्यक नोडल अधिकारी यांचे नाव | कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक | ईमेल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विभागीय सहसंचालक, उ.शि. मुंबई विभाग, मुंबई | श्री.अनिल रणधीर, अधिक्षक, मो.9370146152 | श्री.संजय खरात, कनिष्ठ लिपीक मो.9892519822 | 022 22656600<br>022 22691528 | jdhemumbai@gmail.com |
| 2 | विभागीय सहसंचालक, उ.शि. पुणे विभाग, पुणे | श्री. अरविंद भागवत, मुख्य लिपीक मो.9404869688 | श्री. मयुरेश जोशी, वरिष्ठ लिपीक मो.8975760448 | 020 26127833<br>020 26051632 | jdhepune@gmail.com |
| 3 | विभागीय सहसंचालक, उ.शि. पनवेल विभाग, पनवेल | श्री. युवराज साळुंके कनिष्ठ प्रशासन अधिकारी मो.9004712007 | श्री. सचिन पवार, वरिष्ठ लिपीक मो.9594567255 | 022 27461420<br>022 27453820 | jtdire.1115@gmail.com |
| 4 | विभागीय सहसंचालक, उ.शि. कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | श्री. धर्यशिल कारिदकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी. मो.7506323120 | श्री.अनिल जोंग, कनिष्ठ लिपीक मो.8999443550 | 0231 2535400<br>0231 535454 | jdhekop@gmail.com |
| 5 | विभागीय सहसंचालक, उ.शि. सोलापूर विभाग, सोलापूर | श्री. विलास कदम, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मो.9822904867 | श्री.अशोक वाणी, वरिष्ठ लिपीक मो.8999909142 | 0217 2350055 | jtdirhesol@rediffmail.com |
| 6 | विभागीय सहसंचालक, उ.शि. जळगांव विभाग, जळगांव | श्री राम राठोड, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मो.9422862873 | श्री. हंसराज पाटील, कनिष्ठ लिपीक मो.9423461842 | 0257 2238510 | jdhe_jal@yahoo.co.in |
| 7 | विभागीय सहसंचालक, उ.शि. औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | श्री. संतोष थरोकार, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मो.9404481718 | श्री.ज्ञानेश्वर गायकवाड, कनिष्ठ लिपीक मो.9423448722 | 0240 2331913<br>0240 2322915 | schol.jdheaur@gmail.com |
| 8 | विभागीय सहसंचालक, उ.शि. नांदेड विभाग, नांदेड | श्री. गणेश पाटील, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मो.8275590944 | श्रीम. सुशिला दुगमोड, कनिष्ठ लिपीक मो.9370582338 | 02462 283144 | jdhe.nanded@yahoo.co.in |
| 9 | विभागीय सहसंचालक, उ.शि. अमरावती विभाग, अमरावती | डॉ.प्रभु दवणे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मो.9422809418 | श्री. आकाश दुबे, वरिष्ठ लिपीक मो.9175143163 | 0721 2531235 | jdheamt@yahoo.com |
| 10 | विभागीय सहसंचालक, उ.शि. नागपूर विभाग, नागपूर | श्री.अशोक बागल, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मो.7756822910 | श्री.दिलीप आवारे, वरिष्ठ लिपीक, मो.9389514471 | 0612 2554210 | jdhengp@rediffmail.com |

| अ.क्र. | केंद्रशासन पुरस्कृत योजना |
| --- | --- |
| 1 | अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना |
| 2 | महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेन्ट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना |
| 3 | अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना |

# ❖ केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना

## ❖ योजनेच्या प्रमुखअटी:

- (Fresh) नविन मंजूरी साठी अर्ज भरणा-या विद्यार्थ्याने मागील वार्षिक परीक्षेत किमान 50 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
- (Fresh) नविन मंजूरी साठी अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. 2.00 लाख पर्यंत असावे.
- अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
- (Renewal) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास मागील वार्षिक परीक्षेत 50 टक्के गुण असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमात शिकत असणे आवश्यक आहे.
- (Renewal) नुतनिकरणाचे अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांना उत्पन्न प्रमाण पत्राची आटी लागू नाही.
- एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
- विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी 1 वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.

## ❖ आवश्यक कागदपत्रे:

- मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत,सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक.
- सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले रहिवास प्रमाणपत्र आवश्यक,महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती.
- महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र,अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषीत प्रमाणपत्र.

## ❖ दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप

| अ. क्र. | शुल्क प्रकार | अभ्यासक्रम | देय लाभ |
|---|---|---|---|
| 1 | शिक्षण शुल्क | इ. 11 वी व इ. 12 वी. | रु. 7,000/- प्रतिवर्ष |
| | | इ. 11 वी 12 वी समकक्ष व्यावसायिक अभ्यासक्रम | रु. 10,000/- प्रतिवर्ष |
| | | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम | रु. 3,000/- प्रतिवर्ष |
| 2 | निर्वाह भत्ता | इ. 11 वी 12 वी तसेच समकक्ष व्यावसायिक अभ्यासक्रम | 1. दहा महिन्यासाठी रु. 3,800/- (हॉस्टेल मध्ये वास्तव्य असलेल्या विद्यार्थ्यांकरीता)<br>2. दहा महिन्यासाठी रु. 2,300/- (हॉस्टेल मध्ये राहत नसलेल्या विद्यार्थ्यांकरीता) |
| | | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (बिगरव्यावसायिक अभ्यासक्रम) | 1. दहा महिन्यासाठी रु. 5,700/- (हॉस्टेल मध्ये वास्तव्य असलेल्या विद्यार्थ्यांकरीता)<br>2. दहा महिन्यासाठी रु. 3,000/- (हॉस्टेल मध्ये राहत नसलेल्या विद्यार्थ्यांकरीता) |
| | | एम.फिल व पीएचडी अभ्यासक्रम | 1. दहा महिन्यासाठी रु. 12,000/- (हॉस्टेल मध्ये वास्तव्य असलेल्या विद्यार्थ्यांकरीता)<br>2. दहा महिन्यासाठी रु. 5,500/- (हॉस्टेल मध्ये राहत नसलेल्या विद्यार्थ्यांकरीता) |

# 2. महाविद्यालयीन व विद्यापिठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना

❖ योजनेच्या प्रमुख अटी:

- उच्च माध्यमिक 12 वी (10+2) किंवा समकक्ष असणा-या परीक्षेत उत्तीर्ण Top 20 Percentile यादील सर्व विद्यार्थी पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू आहे.
- अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड लाभार्थी नसावा.
- (Fresh) नविन मंजूरी साठी अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.4.50 लाख पेक्षा जास्त नसावे.
- (Renewal) नुतनिकरणाचे अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांना उत्पन्न प्रमाण पत्राची आटी लागू नाही.
- (Renewal) नुतनीकरणचा अर्ज भरणेसाठी विद्यार्थ्यांने मागील वर्षीक परीक्षेत 50 टक्के गूण प्राप्त करणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक आहे.
- एखादा पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)
- एखादया पात्र विद्यार्थ्यांचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

## ❖ आवश्यक कागदपत्रे

- मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.
- सक्षम प्राधिकरणाने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- सक्षम प्राधिकरणाने दिलेले रहिवास प्रमाणपत्र.
- महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट

## ❖ दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप

| अ.क्र. | अभ्याक्रमाचा प्रकार | देय रक्कम |
|---|---|---|
| 1 | पदवी | रक्कम रु. 12,000/- |
| 2 | पदव्युत्तर पदवी | रक्कम रु. 20,000/- |
| 3 | पदवी व पदव्युत्तर एकत्रित (Integrated Course) | 1.प्रथम 3 वर्षासाठी रक्कम रु.12,000/-<br>2. पुढील 4 थे व 5 वे वर्षासाठी रक्कम रु. 20,000/- |
| 4 | अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी | 1. प्रथम 3 वर्षांसाठी - रक्कम रु.12,000/-<br>2. शेवटच्या वर्षासाठी - रक्कम रु.20,000/- |

# 3. दिव्यांग अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.

## ❖ योजनेच्या प्रमुख अटी:

- अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा,अपंगत्व टक्केवारी 40 टक्के व त्यापुढील असावी.
- मागील वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेला असावा,अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.
- (Fresh) नविन मंजूरी साठी अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. 2.50 लाख पेक्षा जास्त नसावे.
- (Renewal) नुतनिकरणाचे अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांना उत्पन्न प्रमाण पत्राची आटी लागू नाही.
- विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी 1 वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांने कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे.

## ❖ आवश्यक कागदपत्रे:

- मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत,सक्षम प्राधिकरणाने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- सक्षम प्राधिकरणाने दिलेले रहिवास प्रमाणपत्र,महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती.
- विद्यार्थ्यांचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र.महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.

## ❖ दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप:

✓ पोस्ट मॅट्रिक, प्रि-मॅट्रिक, टॉपक्लास तीन्ही योजनेचे मिळून 50% मुलींसाठी राखीव जागा आहेत जर मुलींची संख्या उपलब्ध न झाल्यास सदरील जागा मुलांमध्ये विभागूण देण्यात येतील. तसेच दुरस्त शिक्षण ( Distance Education ) घेत असणारे सर्व विद्यार्थी योजनेचा अर्ज भरु शकतात.

❖ **अनुज्ञेय लाभ :-**

## निर्वाह भत्ता

| अ. क्र | कोर्सेस | हॉस्टेल मध्ये वास्तव्य असलेल्या विद्यार्थ्यांना दहा महिन्याकरीता | हॉस्टेल मध्ये राहत नसलेल्या विद्यार्थ्यांना दहा महिन्याकरीता |
|---|---|---|---|
| 1 | अभियांत्रिकी,वैद्यकीय,व्यवस्थापन,संगणक विज्ञान, कृषी, नियोजन/आर्किटेक्चर, फॅशन तंत्रज्ञान, पशुवैद्यकीय, आणि संबंधित विज्ञान,व सर्व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी | रु.16000/- | रु.7500/- |
| 2 | पदवी/डिप्लोमा, फार्मसी (बी.फार्मा ) एलएलबी, बीएफएस,हॉटेल मॅनेजमेंट, पॅरामेडिकल शाखा, जसे की पुनर्वसन, डायग्नोस्टिक्स,केटरिंग ट्रॅव्हल/पर्यटन/आतिथ्य, अंतर्गत सजावट,पोषण, आहारशास्त्र | रु.11000/- | रु.7000/- |
| 3 | बीए, बी.कॉम, बी.एस्सी इत्यादी अभ्याक्रम | रु.9500/- | रु.6500/- |
| 4 | 11 वी आणि 12 वी अभ्यासक्रम, आयटीआय, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी | रु.9000/- | रु.5500 |

## ❖ शिक्षण शुल्क :-

| अ.क्र | शुल्क |
|---|---|
| 1 | केंद्र/राज्य शासनाच्या प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्क रचनेनुसार 1.50 लाख रुपये वार्षिक कमाल मर्यादेपर्यंत दिली जाते. |

## ❖ दिव्यांग भत्ता :-

| अ.क्र | दिव्यांग प्रकार | रक्कम प्रति वर्षी |
|---|---|---|
| 1 | अंधत्व | रु.4000/- |
| 2 | कर्णबधीर | रु.2000/- |
| 3 | शारीरिकदृष्ट्या अक्षम | रु.2000/- |
| 4 | बैध्दिक अपंगत्व | रु.4000/- |
| 5 | वरील सोडून इतर सर्व अपंगत्वासाठी | रु.2000/- |

## ❖ पुस्तक भत्ता :-

| अ.क्र. | कोर्सेस | रक्कम प्रति वर्षी |
|---|---|---|
| 1 | सर्व कोर्सेससाठी | रु.1500/- |

# ❖राज्यशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना व सवलत

| अ.क्र. | योजनेचे नांव |
|---|---|
| 1 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| 2 | डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना |
| 3 | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| 4 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| 5 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| 6 | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| 7 | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| 8 | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| 9 | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| 10 | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| 11 | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| 12 | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| 13 | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| 14 | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग -2) |

# ❖ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. महाराष्ट्र - कर्नाटक राज्य सीमा भागातील विद्यार्थी अर्ज करू शकतात, पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 8 लाख किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.
- शासन निर्णयानुसार प्रथम दोन मुले या योजनेसाठी पात्र आहेत.शासन निर्णय दिनांक 07/10/17 (डीएचई अभ्यासक्रम) मधील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज करू शकतात.
- अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

## 2.आवश्यक कागदपत्रे:

- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र , शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- गॅप संबंधित दस्तऐवज (गॅप असल्यास),दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र.

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप:

- शिक्षण शुल्क
- परीक्षा शुल्क

# ❖ डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना

## 1. योजनेच्या प्रमुख अटी:

- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेस पात्र विद्यार्थी सदर योजनेसाठीही अर्ज करण्यास पात्र आहेत.
- सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यत मर्यादित आहे.
- विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या कालावधीकरीताच निर्वाहभत्ता देण्यात येतो.
- या योजनेअंतर्गत रुपये 1.00 लाखपर्यत उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्याकरीता निर्वाहभत्त्याचा लाभ देण्याकरीता संख्येची कोणतीही मर्यादा असणार नाही. मात्र रुपये 1.00 लाख ते रुपये 8.00 लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक जिल्हयासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांची कमाल संख्या 500 इतकी निश्चित करण्यात येत आहे. त्यापैकी 33 टक्के इतक्या जागा विद्यार्थिनीकरीता राखीव ठेवण्यात येतात.

## 2. आवश्यक कागदपत्रे

- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र , शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- गॅप संबंधित दस्तऐवज (गॅप असल्यास),दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र.

## 3. दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप:

| अ.क्र. | प्रकार | कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा | वसतिगृह ठिकाण | अभ्यासक्रमांसाठी निर्वाह भत्याची रक्कम | प्रत्येक जिल्ह्यासाठीचा संच |
|---|---|---|---|---|---|
| ❑ व्यावसायिक अभ्यासक्रम | | | | | |
| विद्यार्थी | | रु. 1.00 लाखापर्यंत | 2,000/- | अभ्यासक्रम | ग्रामीण |
| | | | इतर शहरे / ग्रामीण भागासाठी | रु. 20,000/- | |
| 02 | इतर विद्यार्थ्यांसाठी | रु. 1.00 लाखापर्यंत | मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ. | रु. 10,000/- | अमर्याद |
| | | | इतर शहरे / ग्रामीण भागासाठी | रु. 8,000/- | |
| 03 | इतर विद्यार्थ्यांसाठी | रु. 1.00 लाख ते रु. 8.00 लाख | मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ. | रु. 10,000/- | 500 |
| | | | इतर शहरे / ग्रामीण भागासाठी | रु. 8,000/- | |
| ❑ बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | | | | | |
| 04 | विद्यार्थी | रु. 1.00 लाखापर्यंत | - | रु. 2,000/- | |

# ❖एकलव्य आर्थिक सहाय्य योजना

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- कला , वाणिज्य , विधी व शिक्षणशास्त्र शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 60 टक्के व विज्ञान शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 70 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 75,000/- किंवा त्यापेक्षा कमी असावे. विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
- सदर शिष्यवृत्ती मंजुर झाल्यास इतर केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही .
- नियमित उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक आहे,नूतनीकरनासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षी किमान 50 टक्के गुण असणे आवश्यक आहे.

## 2.आवश्यक कागदपत्रे:

- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र, संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमापणपत्र.
- मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे .

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप:

- विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु 5000/- शिष्यवृत्ती देण्यात येते.

## ❖गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर)

### 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- माध्यमिक परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणारे गुणवान विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती साठी पात्र आहेत.
- शासनमान्य व अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये/महाविद्यालये यामध्ये मान्य दराने आकारल्या जाणा-या फी ची प्रतिपूर्ती. विना अनुदानित पण शासनमान्य अशा अभियांत्रिकी/वैद्यकीय महाविद्यालयात अथवा तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी/वैद्यकीय महाविद्यालये, तांत्रिक संस्था यामध्ये आकारल्या जाणा-या फीच्या दराने प्रतिपूर्ती करण्यात येते.
- या योजनेचा लाभ घेत असतांना विद्यार्थ्याला केंद्र अथवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीच्या अथवा सवलतीचा लाभ घेता येणार नाही,
- मात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही अट लागू नाही, त्यांना केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / सवलती नुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फी ची भरपाई होत असेल तर अशी शिक्षण फी किंवा परीक्षा फी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय नाही.
- तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यास सदर योजनेचा लाभ घेता येईल. मात्र राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती नुसार मिळणाऱ्या पुस्तक अनुदानाची रक्कम वजा करून सदर शिष्यवृत्तीसाठी पुस्तक अनुदानाची रक्कम देय आहे.

:

### 2.आवश्यक कागदपत्रे:

- मागील वर्षाची गुणपत्रिका,चालू वर्षाची शुल्क भरल्याची पावती.
- वसतिगृहाचे शुल्क भरल्याची पावती,संचालनालयामार्फत पाठविण्यात आलेले शिष्यवृत्ती मंजूरीचे पत्र.

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप

- प्रवेश शुल्क - 100 टक्के,
- सत्र शुल्क - 100 टक्के,
- भोजन शुल्क - 150 रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = 1500 रु.,
- वैद्यकीय खर्च - विद्यार्थ्यांचा झालेला खर्च किंवा रु. 120 यापैकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम,
- परीक्षा शुल्क - 100 टक्के,
- शिक्षण शुल्क - 100 टक्के,
- ग्रंथालय शुल्क - 100 टक्के,
- वसतीगृह शुल्क - 600 रु. वार्षिक,
- प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के,
- जिमखाना शुल्क - 100 टक्के.

# ❖गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर)

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- उच्च माध्यमिक परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणारे गुणवान विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती साठी पात्र आहेत.
- शिष्यवृत्ती पुढे चालू राहण्यासाठी विद्यार्थ्यांचे वर्तन, प्रगती समाधानकारक असणे आवश्यक आहे.
- शासनमान्य व अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये/महाविद्यालये यामध्ये मान्य दराने आकारल्या जाणा-या फी ची प्रतिपूर्ती. विना अनुदानित पण शासनमान्य अशा अभियांत्रिकी/वैद्यकीय महाविद्यालयात अथवा तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेणा- या विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी/वैद्यकीय महाविद्यालये, तांत्रिक संस्था यामध्ये आकारल्या जाणा-या फीच्या दराने प्रतिपूर्ती करण्यात येते.मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही अट लागू नाही, त्यांना केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / सवलती नुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फी ची भरपाई होत असेल तर अशी शिक्षण फी किंवा परीक्षा फी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय नाही.

## 2.आवश्यक कागदपत्रे:

- मागील वर्षाची गुणपत्रिका,चालू वर्षाची शुल्क भरल्याची पावती.
- वसतिगृहाचे शुल्क भरल्याची पावती,DHE शिष्यवृत्ती मंजूर पत्र.

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप:

- प्रवेश शुल्क - 100 टक्क,
- सत्र शुल्क - 100 टक्के,
- भोजन शुल्क - 150 रु, प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = 1500 रु,
- वैद्यकीय खर्च - विद्यार्थ्यांचा झालेला खर्च किंवा रु. 120 यापैकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम,
- परीक्षा शुल्क - 100 टक्के,
- शिक्षण शुल्क - 100 टक्के,
- ग्रंथालय शुल्क - 100 टक्के
- वसतीगृह शुल्क - 600 रु. वार्षिक,
- प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के
- जिमखाना शुल्क - 100 टक्के.

# ❖राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे,इयत्ता बारावी मध्ये किमान 60 टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे,कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी शाखेच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज (Fresh) करण्यास पात्र आहेत.
- या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील,मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.

## 2.आवश्यक कागदपत्रे:

- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र,मागील वर्षाची गुणपत्रिका,बोनाफाईड सर्टिफिकेट

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप:

- सदर योजनेसाठी प्रतिमाह 100 रु. याप्रमाणे दहा महिन्याकरिता रक्कम रु. 1000/- शिष्यवृत्ती देण्यात येते.

# ❖स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे,अर्जदार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य असणे आवश्यक आहे.
- स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना म्हणजेच स्वातंत्र्य सैनिकांचे पत्नी, मुले (दत्तक आणि सावत्र) आणि नातवंड (मृत्यु पावलेल्या मुलांची मुले) या योजनेसाठी अर्ज करू शकतात.

## 2.आवश्यक कागदपत्रे :

- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र मागील वर्षाची गुणपत्रीका , बोनाफाईड सर्टिफिकेट.

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप:

- प्रवेश शुल्क - 100 टक्के ,सत्र शुल्क - 100 टक्के,ग्रंथालय शुल्क -100 टक्के,प्रयोगशाळा शुल्क 100 टक्के
- शिक्षण शुल्क - लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही. (सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत.)
- <u>इतर शिष्यवृत्ती रक्कम</u> -

  a) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम वगळून) - 50 रु. वार्षिक

  b) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम) 60 रु. वार्षिक
- <u>पुस्तके व इतर खर्च</u> -

  a) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम वगळून) - 200 रु. वार्षिक

  b) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम) - 400 रु. वार्षिक

# ❖माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र धारण करणाऱ्या किंवा महाराष्ट्रात भरती झालेल्या मेजर, नौदल वा वायु दलातील तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत (वा त्यापेक्षा कमी दर्जाच्या हुद्यावरुन) सेवेतुन निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना, पत्नींना/विधवांना या योजनेखाली शैक्षणिक सवलती देय आहेत.
- या सवलतीचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीस अन्य दुसऱ्या योजनेखाली फी माफी, पुस्तक अनुदान, गणवेश अनुदान इत्यादी सवलतींचा लाभ या सवलती बरोबर घेता येणार नाही. तसेच एकाच वेळी एका विद्यार्थ्याला एका पेक्षा जास्त अभ्यासक्रमांना या सवलतीचा लाभ दिला जाणार नाही, केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे विद्यार्थीच अर्ज करण्यास पात्र आहेत.

## 2.आवश्यक कागदपत्रे:

- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा पालकांचे माजी सैनिकाचे महाराष्ट्रात भरती / सेवानिवृत्त झालेबाबतचे प्रमाणपत्र, मागील वर्षाची गुणपत्रीका.
- डी.एस.एस.ए.बोर्ड/सी.एस.एस.ए.बोर्ड यांचे महाराष्ट्र राज्याचे अधिकार पत्र धारण करीत असल्याचे किंवा महाराष्ट्रात भरती झाल्याचे व मेजर व नौदल आणि वायुदलातील तत्सम दर्जाच्या हुद्दापर्यंत वा (या हुद्दापेक्षा कमी हुद्दावरुन) निवृत्त माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र.

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप :

- प्रवेश शुल्क - 100 टक्के, सत्र शुल्क - 100 टक्के,ग्रंथालय शुल्क -100 टक्के, प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के , शिक्षण शुल्क.

# ❖शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती

## 1.योजनेच्या प्रमुख अटी :

- विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
- संबंधित विद्यार्थ्याने पीएच.डी. साठी विद्यापीठामध्ये रीतसर नोंदणी करून संबंधित मार्गदर्शकाने शिफारस करणे आवश्यक आहे,अधिछात्रवृत्तीचा कालावधी 3 वर्षाचा राहिल.
- ज्या विद्यार्थांनी पदवी (बी.ए. / बीएससी / बीएड) आणि पदव्युत्तर (एम.ए. / एमएससी / एम.एड.) यापैकी कोणत्याही एका पदवी परीक्षेत किमान 60 टक्के (प्रथम श्रेणी ) व अन्य पदवी परीक्षेत 55 टक्के (द्वितीय श्रेणी ) गुण आवश्यक ,तथापि एखाद्या वर्षी वरील अट पूर्ण करणारे विद्यार्थी उपलब्ध नसतील तर त्या वर्षी ज्या विद्यार्थाने पदवी व पदव्युत्तर स्तरावर द्वितीय श्रेणी (55 टक्के) गुण प्राप्त केली आहे असे विद्यार्थी पात्र समजले जातील.
- सदर शिष्यवृत्ती साठी केवळ (बी.ए. / बीएससी / बीएड) आणि पदव्युत्तर (एम.ए. / एमएससी / एम.एड.) हे अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले विद्यार्थीच अर्ज करू शकतात.नूतनीकरनासाठी विद्यार्थ्याने मागील वर्षीच्या अर्जाच्या Application ID चा उपयोग करावा.

## 2.आवश्यक कागदपत्रे :

- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा,मार्गदर्शकासाठी विद्यापीठाचे मान्यता पत्र.
- पीएच.डी. मार्गदर्शक यांचे, विद्यार्थी त्यांचेकडे पीएच.डी. करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र,पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम गुणपत्रिका.नूतनीकरणासाठी मागील वर्षाचा मार्गदर्शकाने दिलेला प्रगती अहवाल.

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप:

- नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रति माह 750 प्रमाणे रक्कम रु. 7500/- व रु 1000/- वार्षिक सादीलवार खर्च हे लाभ देण्यात येतात.

# ❖शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती

## 1.योजनेच्या प्रमुख अटी :

- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.शासकीय विद्यानिकेतन पुसेगांव, अमरावती, औरंगाबाद, व धुळे मधून इयत्ता 10 वी च्या वर्गात 60% गुण मिळवणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यत चालू राहतील,मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.

## 2.आवश्यक कागदपत्रे :

- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र,मागील वर्षाची गुणपत्रिका,बोनाफाईड प्रमाणपत्र
- शासकीय निद्यानिकेतनाद्वारे प्राप्त इन्टायटलमेंट कार्ड.

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप:

- इ . 10 वी 12 वी प्रतिमाह 100 प्रमाणे रक्कम रू. 1000/-
- पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी प्रतिमाह 150 प्रमाणे रक्कम रु. 1500/- उमेदवारांची निवड मेरिटच्या आधारावर आहे.

# ❖जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती

## 1. योजनेच्या प्रमुख अटी :

- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
- जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे कडून विहित नियमानुसार त्यांचे विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमधून एका निवड केलेल्या विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाची मंजुरी घेऊन सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.
- संशोधन अभ्यासक्रमास जवाहरलाल नेहरू विद्यापीठ नवी दिल्ली येथे प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत.
- नूतनीकरनासाठी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडील वार्षिक प्रगती अहवाल.

## 2. आवश्यक कागदपत्रे :

- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र.
- मागील वर्षाची गुणपत्रिका.
- नूतनीकरणासाठी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडील वार्षिक प्रगती अहवाल.

## 3. दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप :

- सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थास दरमहा रु. 8000/- व रु. 10000/- वार्षिक सादीलवार खर्च अशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

# ❖गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. इ. 12 वी विज्ञान या परीक्षेत किमान 60 टक्के व गणित किंवा भौतिकशास्त्र या विषयात 60 टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
- पदवी अभ्यासक्रमांसाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेताना गणित किंवा भौतिकशास्त्र हा प्रमुख विषय घेणारे विद्यार्थीच या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.
- महाराष्ट्र बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत
- या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.

## 2.आवश्यक कागदपत्रे:

- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र
- मागील वर्षाची गुणपत्रिका
- बोनाफाईड सर्टिफिकेट

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप:

- सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थांना प्रतिमाह 100 रु. याप्रमाणे दहा महिन्याकरिता रक्कम रु.1000/- शिष्यवृत्ती देण्यात येते.

# ❖राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास्तव पात्र आहेत.विद्यार्थी उपरोक्त विद्यापीठांतर्गत पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण असला पाहिजे.
- संच रिक्त असतील तर द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असलेला विद्यार्थी पात्र ठरु शकेल. विद्यापीठांतील संचासाठी ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठात कला, वाणिज्य, विज्ञान व विधी या विषयासाठी प्रवेश घेतलेला असेल तसेच संबंधित विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान व विधी या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असेल असे विद्यार्थी अर्ज करु शकतील.
- शासकीय महाविद्यालयातील विद्यार्थी पदवी परीक्षेतील गुणवत्तेनुसार निवडले जातील, तसेच महाविद्यालयातील अधिछात्रांसाठी कला व विज्ञान अभ्यासक्रमातील विषयांसाठी समान संच निवडले जातील.

## 2.आवश्यक कागदपत्रे:

- पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत.महाविद्यालयात प्रवेश घेतलेबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र.
- सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास  प्रमाणपत्र आवश्यक.

## 3.दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप:

- नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस शा.नि.05.02.2004 प्रमाणे प्रति माह 250 प्रमाणे रक्कम रु. 2500/-

# ❖राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग -2)

## 1.योजनेच्या प्रमुख अटी:

- इयत्त 12 वी नंतरच्या मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांमध्ये (कला, वाणिज्य,विज्ञान) प्रथम वर्ष ते अंतिमवर्षात शिकत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना लागू आहे.विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याच्या रहिवासी असावा व त्याने उच्च माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.
- पालकाचे वार्षिक उत्पन्न हे रु. 8.00 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे,नुतनिकरणासाठी विद्यार्थ्याने पूढील वर्षात प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत 30 % टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखुन ठेवण्यात येतील.

## 2.आवश्यक कागदपत्रे:

- माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणत्र परीक्षा व त्यापुढील परीक्षांमधील गुणपत्रीकेच्या प्रती.सक्षम प्राधिकरणाने देलेले अधिवास प्रमाणपत्र,सक्षम प्राधिकरणाने देलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- महाविद्यालयास चालू वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट. विद्यार्थ्यांचे अल्पसंख्यांक असल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र, महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.

## 3. दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप:

- प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु.5000/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम.

***अधिक माहितीसाठी पोर्टल***

**For National Scholarship Portal**

**https://scholarships.gov.in**

**For MahaDBT Portal**

**https://mahadbtmahait.gov.in**

***(2022-23) साठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यासाठी देण्यात आलेली Link***

**For National Scholarship Portal**

**https://scholarships.gov.in/fresh/schemeSelRegfrmInstruction**

**For MahaDBT Portal**

**https://mahadbtmahait.gov.in/login/login**

*धन्यवाद*